# पोलीस शिपाई / पोलीस शिपाई चालक / बॅण्डस्मन / सशस्त्र पोलीस शिपाई / कारागृह शिपाई भरती-२०२४-२०२५ करीता उमेदवारांसाठी सुचना

(अर्ज ऑनलाईन भरण्याकरीता आवश्यक माहिती www.policerecruitment2025.mahait.org व www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा फक्त www.policerecruitment2025.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

## 1) आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ: -

जाहिरातीत नमुद अर्हता व अटीची पुर्तता करणारे उमेदवार यांनी खाली दिलेल्या विहित दिनांकाच्या मुदतीत ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज भरावेत.

| | | |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ | **दिनांक.२९.१०.२०२५ रोजी १८.०० वा. पासुन** |
| २. | ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | **दिनांक ३०.११.२०२५ रोजी २४.०० वा. पर्यंत** |

## 2) परीक्षा शुल्क: -

सदर परीक्षेकरीता **परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे लागू राहील.**

| अ.क्र. | पदाचे नाव | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | पोलीस शिपाई | रु. ४५०/- | रु. ३५०/- |
| २ | पोलीस शिपाई चालक | रु. ४५०/- | रु. ३५०/- |
| ३. | सशस्त्र पोलीस शिपाई | रु. ४५०/- | रु. ३५०/- |
| ४. | बॅण्डस्मन | रु. ४५०/- | रु. ३५०/- |
| ५. | कारागृह शिपाई | रु. ४५०/- | रु. ३५०/- |

* सदरचे शुल्क ना-परतावा आहे.

## 3) सर्वसाधारण सुचना:

3.1) पोलीस भरती-२०२५ ही महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील विविध घटकात पोलीस शिपाई / पोलीस शिपाई चालक / बॅण्डस्मन / राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई व कारागृह शिपाई संवर्गात दिनांक ३१/१२/२०२५ अखेरपर्यंत रिक्त झालेल्या पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहे. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

3.2) पोलीस भरती-२०२५ च्या प्रक्रियेत तयार करण्यात आलेल्या निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

3.3) पोलीस शिपाई / पोलीस शिपाई चालक / बॅण्डस्मन / राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई व कारागृह शिपाई संवर्गात भरती प्रक्रियेत निवड होऊन नियुक्ती झालेल्या उमेदवारास महाराष्ट्र पोलीस नियमावली, १९९९ व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहित केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

## 4) आवश्यक कागदपत्रे:

सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे व कागदपत्रे आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वी उमेदवारांनी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

4.1) SSC / HSC उत्तीर्ण प्रमाणपत्र,
4.2) जन्म दाखला,
4.3) अधिवास प्रमाणपत्र, (Domicile Certificate)

4.4) जातीचे प्रमाणपत्र
4.5) जात-वैधता प्रमाणपत्र,
4.6) संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MSCIT),
4.7) खेळाडू प्रमाणपत्र व पडताळणी अहवाल अथवा पडताळणीसाठी सादर केलेली पोचपावती (शासन निर्णय दि.१७/३/२०१७, दि. ११/०३/२०१९ व दि.०१.०७.२०२५ प्रमाणे),
4.8) नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र: (वि.जा-अ, भ.ज-ब, भ.ज-क, भ.ज-ड, विमाप्र, इमाव, एसईबीसी, इडब्लूएस प्रवर्गातील पुरूष व महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदांवरील निवडीकरीता दावा करू इच्छित असणाऱ्या महिला यांचेबाबत महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णय दि. ०४/०५/२०२३ मधील तरतूद क्र.४ नुसार),
4.9) माजी सैनिकांसाठी डिस्चार्ज प्रमाणपत्र,
4.10) गृहरक्षक दलाकरिता आवश्यक असलेले प्रमाणपत्र, (जाहिरात दिनांकास १०९५ दिवस पूर्ण झालेल्या उमेदवारास आवेदन अर्ज सादर करता येईल),
4.11) प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र,
4.12) भुकंपग्रस्ताचे प्रमाणपत्र,
4.13) पोलीस पाल्य प्रमाणपत्र,
4.14) अनाथाबाबतचे प्रमाणपत्र,
4.15) अंशकालीन प्रमाणपत्र,
4.16) इ.डब्ल्यू.एस. प्रमाणपत्र,
4.17) एसईबीसी प्रमाणपत्र
4.18) NCC प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे.

उपरोक्त नमूद कागदपत्रे शासन निर्णयानुसार व परिपत्रकानुसार अंतिम निवड करण्यापुर्वी तपासण्यात येतील.

## 5) पोलीस शिपाई गट - क

5.1) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील तरतुदी व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलीस विभागातील विविध पोलीस घटकातील पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई (गट-क); लोहमार्ग पोलीस दलातील पोलीस शिपाई पदे भरण्यासाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

5.2) राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई (गट-क) भरती प्रक्रिया ज्या घटकात राबविण्यात येणार आहे, त्याची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) पो.आ., बृहन्मुंबई (२)पो.आ., ठाणे शहर (३) पो.आ. पुणे शहर , (४) पो.आ., पिंपरी चिंचवड (५) पो.आ., मिरा भाईंदर (६) पो.आ., नागपूर शहर (७) पो.आ., नवी मुंबई (८) पो.आ.,सोलापूर शहर (९) पो.आ. छत्रपती संभाजी नगर (१०) पो.आ., लोहमार्ग मुंबई (११) पो.अ. ठाणे ग्रामीण (१२) पो.अ., रायगड (१३)पो.अ., पालघर (१४)पो.अ., सिंधुदूर्ग (१५)पो.अ., रत्नागिरी( १६) पो.अ., नाशिक ग्रामीण (१७)पो.अ., अहिल्यानगर (१८) पो.अ., जळगांव (१९)पो.अ., धुळे (२०) पो.अ., पुणे ग्रा. (२१) पो.अ., सांगली (२२) पो.अ., कोल्हापूर (२३) पो.अ., सोलापूर ग्रा. (२४) पो.अ.,छत्रपती संभाजी नगर ग्रामीण (२५) पो.अ., जालना (२६) पो.अ., बीड (२७) पो.अ., धाराशिव (२८) पो.अ., नांदेड (२९) पो.अ., लातूर (३०)पो.अ., परभणी (३१)पो.अ., हिंगोली (३२)पो.अ., नागपूर ग्रा. (३३) पो.अ., भंडारा (३४)पो.अ., चंद्रपूर(३५) पो.अ., वर्धा (३६)पो.अ., गडचिरोली (३७)पो.अ., गोंदिया (३८)पो.अ.,अमरावती ग्रा. (३९)पो.अ., अकोला (४०) पो.अ., वाशिम (४१)पो.अ., बुलढाणा (४२)पो.अ., यवतमाळ (४३)पो.अ., लोहमार्ग पुणे (४४) पो.अ.,लोहमार्ग औरंगाबाद (४५) पो.अ.,लोहमार्ग नागपूर

5.3) सेवा प्रवेश नियम:

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदासाठी खालील सेवाप्रवेश नियम लागू राहतील.

i) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम-२०११ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह.

ii) वर नमूद सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.policerecruitment2025.mahait.org व www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

5.3) वयोमर्यादा:

अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच **दिनांक ३०.११.२०२५ रोजी किमान व कमाल वयोमर्यादा खालील प्रमाणे राहील:-**

i)

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | खुला | १८ वर्षे | २८ वर्षे |
| २. | मागास प्रवर्ग (अ.जाती, अ.जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र., इ.मा.व.,एस.ई.बी.सी., इ.डब्ल्यू.एस.) | १८ वर्षे | ३३ वर्षे |
| ३. | प्रकल्पग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ४. | भूकंपग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ५. | माजी सैनिक उमेदवार | १८ वर्षे | उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. |
| ६. | पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | १८ वर्षे | ५५ वर्षे |

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| ७. | अनाथ | १८ वर्षे | ३३ वर्षे |

ii) समांतर आरक्षणांतर्गत येणारे उमेदवार

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | खुला वर्ग | मागास प्रवर्ग |
| १. | महिला उमेदवार | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| २. | खेळाडू उमेदवार | १८ वर्षे | २८+५ वर्षे | ३३+५ वर्षे. |
| ३. | पोलीस पाल्य | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ४. | गृहरक्षक | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ५. | माजी सैनिकावर अवलंबून असलेले (मुलगा, मुलगी, पत्नी) उमदेवार | १८ वर्षे | २८+३ वर्षे | ३३+३ वर्षे |

**टिप :- शासन आदेश क्र.पोलीस-११२५/प्र.क्र.१७३/पोल-५ अ, दिनांक १७/१०/२०२५ अन्वये दिनांक ०१ जानेवारी २०२२ पासून सुरु होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गाचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदासाठी सन २०२४ व सन २०२५ या कॅलेंडर वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेकरीता, एक वेळची उपाययोजना म्हणून पात्र असतील.**

## 5.4) शैक्षणिक अर्हता:

(i) महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकंडरी स्कूल परीक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परीक्षा ह्या राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत) (१२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्षबाबतचे गृह विभाग शासन पत्र क्र. आरसीटी-०३०५/ सीआर-२६६/पोल-५अ, दिनांक २९/०६/२००५ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार).

(ii) समकक्षबाबत:

a) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक (विद्यापिठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला वा यशवंतराव मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार) (शासन निर्णय क्र. साप्रवि आरजीडी १५/११/प्र.क्र.८९/१३, दिनांक २०/५/२०११)

b) विद्यापीठे, मानीव विद्यापीठे, ऐच्छिक मान्य शैक्षणिक संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवीका समकक्षमता (महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचेकडील क्र. समक १०९९/प्र.क्र.१३४/मशि-३, दिनांक १४/६/१९९९ व समक १०९९/१३४/मशि-६, दि.२८/२/२००७)

c) व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाने ०२ वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणासाठी २ स्तराची समकक्षता निश्चित केलेले (महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचकडील क्र. व्हीओसी २०१२/५९१/प्र.क्र.२४५ (अ) / व्यशि-४, दिनांक २८/९/२०१२ व महाराष्ट्र शासन शाळेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. ओप्रशि२०१८/प्र.क्र.११०/एसडी-३, दिनांक २७/९/२०१८)

d) डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनियरिंग (महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शसन निर्णय क्र. एसएससी २००५/(१४९)०५-उमाशि-२, दिनांक २०/६/२००५ च्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा शिक्षण यांचेकडील पत्र क्र. एसएससी २०१०/६ (६६/१०)/उमाशि-२, दिनांक २९/४/२०१० व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार).

(iii) माजी सैनिक: १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण असणाऱ्यांच्या बाबतीत नागरी परीक्षा इयत्ता १० वी उत्तीर्ण किंवा IASC (Indian Army Special Certificate of Education) प्रमाणपत्र व १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण नसलेल्यांच्या बाबतीत इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(iv) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद: शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत ते भरतीकरता पात्र ठरतील.

## 5.5) शारीरिक पात्रता:

i)

| | महिला उमेदवारांकरिता | पुरुष उमेदवारांकरिता | तृतीय पंथी (ट्रान्सजेंडर) |
|---|---|---|---|
| अ) उंची | १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी | १६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. | (अ) स्वत:ची लिंग ओळख महिला / तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तींसाठी :- १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी<br>(ब) स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या व्यक्तीसाठी<br>१६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. |
| ब) छाती | ----- | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा. | स्वत:ची लिंग ओळख महिला / पुरुष / तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तीसाठी आवश्यक नाही. |

ii) सूट:

I) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश ) नियम २०११ यांच्या नियम ३ मध्ये, पोट नियम (२) मधील (१)खंड (अ), मध्ये, उपखंड (ब) मधील , परिच्छेद (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल- **जे उमेदवार, आवश्यक पात्रता शर्तीची पुर्तता करतात अशा अनुसूचित जमातीतील उमेदवारांना आवश्यक असलेल्या उंचीमध्ये ५ सेटीमीटर इतकी शिथिलता देण्यात येईल**.

II) शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल:

a) उंची : ४.० सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

b) छाती : छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.

III) टीप: महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ चा उपखंड (क) नुसार विहित केलेल्या शारिरीक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील उमदेवारांच्या बाबतीत वरीलप्रमाणे शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

IV) खेळाडू उमेदवारासाठी: आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरुष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ सें.मी. इतकी सूट देय राहील.

V) पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांबाबत: पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस दलातील भरतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल.

**a)** उंची : - २.५ सें.मी. पुरुष व महिला उमेदवारांसाठी.

**b)** छाती: - २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून पुरुष उमेदवारांसाठी.

## 5.6) अन्य अर्हता:

(i) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३(१)(ड) नुसार पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु **सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षांच्या आत परवाना धारण करण्यात येईल व त्या कालावधीत हा परवाना धारण न केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल, याबाबतचे बंधपत्र सादर केल्यास असा उमेदवार या पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहील**. उपरोक्त नियम ३(१)(ड) नुसार हलके वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त केलेला असणे ही अर्हता असल्यामुळे उमेदवाराने शारिरीक मोजमापाच्या दिवशी सदरचा परवाना व त्याची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. अथवा परवाना प्राप्त केलेला नसल्यास वर नमूद केल्यानुसार दोन वर्षांच्या आत परवाना धारण करण्याबाबत उमेदवारास **बंधपत्र** सादर करावे लागेल.

(ii) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम १२ नंतर नव्याने नियम १३ **[संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे]** अंतर्भुत करण्यात आला आहे. त्यामुळे पोलीस शिपाई पदावरील नियुक्तीसाठी आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

(iii) गडचिरोली जिल्ह्याकरिता शासन, गृहविभाग आदेश दिनांक २३.०८.२०१८ नुसार गडचिरोली जिल्हयातील पोलीस भरतीमध्ये आवेदन सादर करणाऱ्या उमेदवाराला अतिरिक्त १०० गुणांची गोंडी आणि माडीया भाषेची लेखी चाचणी परीक्षा दयावी लागेल. गडचिरोली जिल्हयामध्ये राहणाऱ्या उमेदवारांनाच गडचिरोली जिल्हा पोलीस भरतीमध्ये भाग घेता येईल. सदर उमेदवारांना प्रचलित नियमानुसार संबंधित तहसिलदार यांनी दिलेला वास्तव्याचा दाखला (Residential Certificate) जोडणे आवश्यक राहील. असे उमेदवार गडचिरोली जिल्हयाच्या बाहेर बदलीपात्र असणार नाहीत.

(iv) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ मंत्रालय मुंबई ३२, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार सदरील पदासाठी संगणक अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

(v) शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ४.२.२०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्रधारक असावा.

(vi) मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक: माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(vii) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जूलै, २००५ अन्वये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये

गट अ, ब, क आणि ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन  नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य आहे.

(viii) शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

(ix) नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तसेच, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१  व महाराष्ट्र पोलीस नियमावली, १९९९ मधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

(x) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू राहील. तथापि, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४]  आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन, वित्त विभाग निर्णय क्र.अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दिनांक २१ ऑगस्ट २०१४ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)" या नावाने लागू होईल.

(xi) महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचेकडील दिनांक २०.१०.२०२२ अन्वये एनसीसी ''क'' प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार, पाच अधिकच्या (बोनस) गुणांसाठी पात्र असतील.

## 5.7) शारीरिक चाचणी:

(i) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची खालीलप्रमाणे ५० गुणांची शारीरिक चाचणी घेतली जाईल :

(ii)

| **पुरुष उमेदवार** | **गुण** | | **महिला उमेदवार** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| (क) १६०० मीटर धावणे | २० | | (क) ८०० मीटर धावणे | २० |
| (ख) १०० मीटर धावणे | १५ | | (ख) १०० मीटर धावणे | १५ |
| (ग) गोळाफेक | १५ | | (ग) गोळाफेक | १५ |
| **एकुण** | **५०** | | **एकुण** | **५०** |

(iii)

| **पुरुष / तृतीय पंथी उमेदवार** | **गुण** | | **महिला तृतीय पंथी: - स्वत: ची लिंग ओळख महिला पुरुष / तृतीय पंथी अशी केलेले उमेदवार** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| (क) १६०० मीटर धावणे | २० | | (क) ८०० मीटर धावणे | २० |
| (ख) १०० मीटर धावणे | १५ | | (ख) १०० मीटर धावणे | १५ |
| (ग) गोळाफेक | १५ | | (ग) गोळाफेक | १५ |
| **एकुण** | **५०** | | **एकुण** | **५०** |

## 5.8) लेखी चाचणी:

(i) शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.

(ii) उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.

(iii) लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा दिनांक निश्चित करण्यात येईल.

(iv) **संपूर्ण राज्यभर सर्व पोलीस घटकात एका पदाकरीता एकाच दिवशी लेखी परिक्षा आयोजित करण्यात येणार आहे. अर्जदारांनी ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवूनच आवेदन अर्ज पूर्ण विचारांती भरावा.**

(v) लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:-

a) अंकगणित;
b) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी;
c) बुध्दीमत्ता चाचणी;
d) मराठी व्याकरण

(vi) वरील पदाकरिता शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रीत गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार अंतिम निवड यादी / प्रतीक्षा यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करुन प्रसिद्ध करण्यात येईल. (उदा. गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पोलीस -१८१९/प्र.क्र ३१६/पोल-५ अ, दिनांक १०/१२/२०२० नुसार).

## 6) पोलीस शिपाई चालक: -

6.1) महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलीस विभागातील जिल्हा पोलीस दलातील पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालकांची पदे भरण्यासाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

6.2) ज्या घटकात पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, त्याची नावे पुढीलप्रमाणे आहेत :-

| | | |
|---|---|---|
| (१) पो.आ., मिरा भाईंदर वसई विरार | (२) पो.आ., नवी मुंबई | (३) पो.आ., पुणे शहर |
| (४) पो.अ., रायगड | (५) पो.अ., पालघर | (६) पो.अ., रत्नागिरी |
| (७) पो.अ., सिंधुदूर्ग | (८) पो.अ., पुणे ग्रा. | (९) पो.अ., नाशिक ग्रामीण |
| (१०) पो.अ., धाराशिव | (११) पो.अ., वाशिम | (१२) पो.अ., बुलढाणा |
| (१३) पो.अ., लातूर | (१४) पो.अ., परभणी | (१५) पो.अ.,हिंगोली |
| (१६)पो.अ., गडचिरोली | | |

सन २०१९ च्या चालक पोलीस शिपाई भरतीमधील काही उमेदवारांनी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे याचिका क्रमांक ११३५३/२०२४ दाखल केलेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. सदर याचिकेतील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार जाहीरातीमधील नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो.

6.3) सेवा प्रवेश नियम:

i) महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई चालक या पदासाठी खालील सेवाप्रवेश नियम लागू राहतील.

a) महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवा प्रवेश) नियम, २०१९ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह

b) वर नमूद सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.policerecruitment2025.mahait.org व www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

6.4) वयोमर्यादा:

अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक ३०.११.२०२५ रोजी किमान व कमाल वयोमर्यादा खालील प्रमाणे राहील:-

(i)

| अ. क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | खुला | १९ वर्षे | २८ वर्षे |
| २. | मागास प्रवर्ग (अ. जाती, अ. जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र., इ.मा.व., एस.ई.बी.सी., इ.डब्ल्यू.एस.) | १९ वर्षे | ३३ वर्षे |
| ३. | प्रकल्पग्रस्त उमेदवार | १९ वर्षे | ४५ वर्षे |
| ४. | भूकंपग्रस्त उमेदवार | १९ वर्षे | ४५ वर्षे |
| ५. | माजी सैनिक उमेदवार | १९ वर्षे | उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी सूट राहील. |
| ६. | अंशकालीन पदवीधर उमेदवार | १९ वर्षे | ५५ वर्षे |
| ७. | अनाथ | १९ वर्षे | ३३ वर्षे |

(ii) समांतर आरक्षणांतर्गत येणारे उमेदवार:

| अ. क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | खुला वर्ग | मागास प्रवर्ग |
| १. | महिला उमेदवार | १९ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| २. | खेळाडू उमेदवार | १९ वर्षे | २८+५ वर्षे | ३३+५ वर्षे. |
| ३. | पोलीस पाल्य | १९ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ४. | गृहरक्षक | १९ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ५. | माजी सैनिकावर अवलंबून असलेले (मुलगा, मुलगी, पत्नी) उमदेवार | १९ वर्षे | २८+३ वर्षे | ३३+३ वर्षे |

**टिप :- शासन आदेश क्र. एमटीएस ०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४,दिनांक २७.१०.२०२५:- दिनांक ०१ जानेवारी २०२२ पासून सुरु होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गाचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदासाठी सन २०२४ व सन २०२५ या कॅलेंडर वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेकरीता, एक वेळची उपाययोजना म्हणून पात्र असतील.**

6.5) शैक्षणीक अर्हता:

(i) महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकंडरी स्कूल परीक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परीक्षा ह्या राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत) (१२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्षबाबतचे गृह विभाग शासन पत्र क्र. आरसीटी-०३०५/ सीआर-२६६/पोल-५अ, दिनांक २९/०६/२००५ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार).

(ii) समकक्षबाबत:

a) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक (विद्यापिठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला वा यशवंतराव मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार) (शासन निर्णय क्र. साप्रवि आरजीडी १५/११/प्र.क्र.८९/१३, दिनांक २०/५/२०११)

b) विद्यापीठे, मानीव विद्यापीठे, ऐच्छिक मान्य शैक्षणिक संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवीका समकक्षमता (महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचेकडील क्र. समक १०९९/प्र.क्र.१३४/मशि-३, दिनांक १४/६/१९९९ व समक १०९९/१३४/मशि-६, दि.२८/२/२००७)

c) व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाने ०२ वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणासाठी २ स्तराची समकक्षता निश्चित केलेले (महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचकडील क्र. व्हीओसी २०१२/५९१/प्र.क्र.२४५ (अ) / व्यशि-४, दिनांक २८/९/२०१२ व महाराष्ट्र शासन शाळेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. ओप्रशि२०१८/प्र.क्र.११०/एसडी-३, दिनांक २७/९/२०१८)

d) डिप्लोमा इन मेकेलिकल इंजिनियरिंग (महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शसन निर्णय क्र. एसएससी २००५/(१४९)०५-उमाशि-२, दिनांक २०/६/२००५ च्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा शिक्षण यांचेकडील पत्र क्र. एसएससी २०१०/६ (६६/१०)/उमाशि-२, दिनांक २९/४/२०१० व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार).

(iii) माजी सैनिक: १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण असणाऱ्यांच्या बाबतीत नागरी परीक्षा इयत्ता १० वी उत्तीर्ण किंवा IASC (Indian Army Special Certificate of Education) प्रमाणपत्र व १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण नसलेल्यांच्या बाबतीत इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(iv) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद :- शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत ते भरतीकरता पात्र ठरतील.

## 6.6) शारीरिक पात्रता:

(i)

| | **महिला उमेदवारांकरिता** | **पुरुष उमेदवारांकरिता** | **तृतीय पंथी (ट्रान्सजेंडर)** |
|---|---|---|---|
| अ) उंची | १५८ से.मी. पेक्षा कमी नसावी | १६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. | (अ) स्वत:ची लिंग ओळख महिला / तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तींसाठी :- १५८ से.मी. पेक्षा कमी नसावी<br>(ब) स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या व्यक्तीसाठी<br>१६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. |
| ब) छाती | ----- | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा. | स्वत:ची लिंग ओळख महिला / पुरुष / तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तीसाठी आवश्यक नाही. |

(ii) सूट :

(i) शासनाने नक्षलग्रस्त भाग म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील रहिवासी असलेले आणि अनुसूचित जमातीचे किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नलक्षविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल:

**छाती : छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.**

(ii) टीप:- महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम ६ चा उपखंड (१) (ड) नुसार विहित केलेल्या शारिरीक पात्रता शासनाने नक्षलग्रस्त भाग म्हणून अधिसूचित केलेल्या

क्षेत्रातील उमेदवारांच्या बाबतीत वरीलप्रमाणे शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील. असे उमेदवार भरती झालेल्या जिल्हयाच्या बाहेर बदलीस पात्र असणार नाहीत.

6.7) अन्य अर्हता:

(i) महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम ६ चा उपखंड (१) (क) नुसार उमेदवाराने पोलीस शिपाई चालक पदासाठी अर्ज सादर करतेवेळी अनुज्ञप्ती अदा करण्याकरिता प्राधिकृत केलेले सक्षम प्राधिकारी यांनी अदा केलेला हलके वाहन (LMV-TR) चालविण्याचा वैध परवाना धारण करणे आवश्यक राहील. तसेच सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दिलेल्या न्यायनिवाडयानुसार हलके वाहन चालविण्याचा (LMV) किंवा हलके वाहन चालविण्याचा (LMV TR) ह्यापैकी कोणताही एक वैध परवाना धारण करीत असलेल्या उमेदवारांना पोलीस शिपाई चालक पदासाठी आवेदन अर्ज सादर करु शकतात.

(ii)सदर भरती प्रक्रियेमध्ये निवड होऊन पोलीस शिपाई चालक पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम ६ चा उपखंड (१)(क)(२) नुसार जड वाहन (HGV) आणि जड वाहन प्रवासी (HPMV) चालविण्याचा परवाना नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून पुढील ५ वर्षात प्राप्त करणे बंधनकारक राहील.

(iii) पोलीस शिपाई चालक पदासाठी आवेदन अर्ज सादर केलेला उमेदवार हा महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम ६ चा उपखंड (१)(क)(३) नुसार कोणतेही मादक द्रव्ये किंवा मद्य सेवन करुन वाहन चालविण्यासंदर्भातील मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कोणत्याही अपराधासाठी दोषी सिध्द झालेला नसावा.

(iv) गडचिरोली जिल्ह्याकरिता शासन, गृहविभाग अधिसूचना दिनांक २३.०९.२०२२ नुसार गडचिरोली जिल्हयातील पोलीस भरतीमध्ये आवेदन सादर करणाऱ्या उमेदवाराला अतिरिक्त १०० गुणांची गोंडी आणि माडीया भाषेची लेखी चाचणी परीक्षा दयावी लागेल. गडचिरोली जिल्हयामध्ये राहणाऱ्या उमेदवारांनाच गडचिरोली जिल्हा पोलीस भरतीमध्ये भाग घेता येईल. सदर उमेदवारांना प्रचलित नियमानुसार संबंधित तहसिलदार यांनी दिलेला वास्तव्याचा दाखला (Residential Certificate) जोडणे आवश्यक राहील. असे उमेदवार गडचिरोली जिल्हयाच्या बाहेर बदलीपात्र असणार नाहीत.

(v) मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक: माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(vi) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ मंत्रालय मुंबई ३२, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार सदरील पदासाठी संगणक अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

(vii) शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ४.२.२०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्रधारक असावा.

(viii) शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

(ix) नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तसेच, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ व महाराष्ट्र पोलीस नियमावली, १९९९ मधील तरतुदी उमेदवारांस बंधकारक राहतील.

(x) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू राहील. तथापि, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन, वित्त विभाग निर्णय क्र.अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दिनांक २१ ऑगस्ट २०१४ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)" या नावाने लागू होईल.

(xi) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जूलै, २००५ अन्वये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये गट अ, ब, क आणि ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य आहे.

## 6.8) शारीरिक चाचणी:

i) महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील तरतुदींनुसार व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार पोलीस शिपाई चालक पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची खालीलप्रमाणे ५० गुणांची शारीरिक चाचणी घेतली जाईल :-

ii)

| **पुरुष उमेदवार** | **गुण** | | **महिला उमेदवार** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| (अ) १६०० मीटर धावणे | ३० | | (अ) ८०० मीटर धावणे | ३० |
| (ब) गोळाफेक | २० | | (ब) गोळाफेक | २० |
| **एकुण** | **५०** | | **एकुण** | **५०** |

iii)

| **पुरुष तृतीय पंथी: - स्वत: ची लिंग ओळख पुरुष असे केलेले उमेदवार** | **गुण** | | **महिला तृतीय पंथी: - स्वत: ची लिंग ओळख महिला पुरुष / तृतीय पंथी अशी केलेले उमेदवार** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| (अ) १६०० मीटर धावणे | ३० | | (अ) ८०० मीटर धावणे | ३० |
| (ब) गोळाफेक | २० | | (ब) गोळाफेक | २० |
| **एकुण** | **५०** | | **एकुण** | **५०** |

(iv) पोलीस शिपाई चालक पदाकरीता कौशल्य चाचणी:

a) शारीरिक चाचणी झाल्यानंतर शारिरीक चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवून लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी खालीलप्रमाणे द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल.

b) कौशल्य चाचणीमध्ये पुढील चाचण्यांचा समावेश असेल :-

| | |
|---|---|
| (अ) हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी | २५ गुण |
| (ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी | २५ गुण |

c) कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत.

d) वाहन चालविण्यातील कौशल्य चाचणीचे निकष, महासंचालकांकडून वेळोवेळी ठरविण्यात येतील.

e) वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्याकरीता, समितीमध्ये प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

## 6.9) लेखी चाचणी:

(i) शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.

(ii) लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी (अ) हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी (२५ गुण) व (ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी (२५ गुण) अशा दोन चाचण्या द्याव्या लागतील. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल.

(iii) कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकूण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत.

(iv) कौशल्य चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना लेखी चाचणीसाठी बोलविण्यात येईल. लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा दिनांक निश्चित करण्यात येईल.

(v) **संपूर्ण राज्यभर सर्व पोलीस घटकात एका पदाकरीता एकाच दिवशी लेखी परिक्षा आयोजित करण्यात येणार आहे. अर्जदारांनी ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवूनच आवेदन अर्ज पूर्ण विचारांती भरावा.**

(vi) लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :-

a) अंकगणित
b) सामान्यज्ञान व चालू घडामोडी
c) बुध्दीमत्ता चाचणी
d) मराठी व्याकरण आणि
e) मोटार वाहन चालविणे / वाहतुकीबाबतचे नियम

(v) वरील पदाकरिता शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रीत गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार अंतिम निवड यादी / प्रतीक्षा यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करुन प्रसिद्ध करण्यात येईल. (उदा.गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पोलीस -१८१९/प्र.क्र ३१६/पोल-५ अ, दिनांक १०/१२/२०२० नुसार).

## 7) पोलीस शिपाई बॅण्डस्मन: -

7.1) पोलीस शिपाई भरती घटकांची नावे:

| **पोलीस शिपाई पदांमध्ये अंतर्भुत बॅण्डस्मन यांची रिक्त पदे असलेले घटक** | |
|---|---|
| (१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | (२)पोलीस अधीक्षक, यवतमाळ |
| **बॅण्डस्मन यांची रिक्त पदे वेगळे दर्शविण्यात असलेले घटक** | |
| (३) पोलीस आयुक्त, पुणे शहर | (४) पोलीस आयुक्त, सोलापूर शहर |
| (५) पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण | (६) पोलीस अधीक्षक, वाशिम |
| (७) पोलीस अधीक्षक, गोंदिया | |

7.2) सेवा प्रवेश नियम:

वर नमूद सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.policerecruitment2025.mahait.org

व www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

7.3) वयोमर्यादा:

अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक ३०.११.२०२५ रोजी किमान व कमाल वयोमर्यादा खालील प्रमाणे राहील:-

i)

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | खुला | १८ वर्षे | २८ वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मागास प्रवर्ग (अ.जाती, अ.जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र., इ.मा.व.,एस.ई.बी.सी., इ.डब्ल्यू.एस.) | १८ वर्षे | ३३ वर्षे |
| ३. | प्रकल्पग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ४. | भूकंपग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ५. | माजी सैनिक उमेदवार | १८ वर्षे | उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. |
| ६. | पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | १८ वर्षे | ५५ वर्षे |
| ७. | अनाथ | १८ वर्षे | ३३ वर्षे |

ii) समांतर आरक्षणांतर्गत येणारे उमेदवार

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | खुला वर्ग | मागास प्रवर्ग |
| १. | महिला उमेदवार | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| २. | खेळाडू उमेदवार | १८ वर्षे | २८+५ वर्षे | ३३+५ वर्षे. |
| ३. | पोलीस पाल्य | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ४. | गृहरक्षक | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ५. | माजी सैनिकावर अवलंबून असलेले (मुलगा, मुलगी, पत्नी) उमदेवार | १८ वर्षे | २८+३ वर्षे | ३३+३ वर्षे |

**टिप :- शासन आदेश क्र.पोलीस-११२५/प्र.क्र.१७३/पोल-५ अ, दिनांक १७/१०/२०२५ अन्वये दिनांक ०१ जानेवारी २०२२ पासून सुरु होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गाचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदासाठी सन २०२४ व सन २०२५ या कॅलेंडर वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेकरीता, एक वेळची उपाययोजना म्हणून पात्र असतील.**

7.4) शैक्षणीक अर्हता:

i) महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा. अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

7.5) शारीरिक पात्रता:

(i)

| | महिला उमेदवारांकरिता | पुरुष उमेदवारांकरिता | तृतीय पंथी (ट्रान्सजेंडर) |
|---|---|---|---|
| अ) उंची | १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी | १६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. | (अ) स्वत:ची लिंग ओळख महिला / तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तींसाठी :<br>१५५ से.मी. पेक्षा कमी नसावी<br>(ब) स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या व्यक्तीसाठी १६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. |
| ब) छाती | ----- | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा. | स्वत:ची लिंग ओळख महिला / पुरुष / तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तीसाठी आवश्यक नाही. |

(ii) सूट :

a) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश ) नियम २०११ यांच्या नियम ३ मध्ये, पोट नियम (२) मधील (१)खंड (अ), मध्ये, उपखंड (ब) मधील , परिच्छेद (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल- जे उमेदवार, आवश्यक पात्रता शर्तीची पुर्तता करतात अशा अनुसूचित जमातीतील उमेदवारांना आवश्यक असलेल्या उंचीमध्ये ५ सेटीमीटर इतकी शिथिलता देण्यात येईल.

b) शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल:

(i) उंची : ४.० सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(ii)छाती : छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.

c) टीप:- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ चा उपखंड (क) नुसार विहित केलेल्या शारिरीक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील उमदेवारांच्या बाबतीत वरीलप्रमाणे शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

d) खेळाडू उमेदवारासाठी: आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरुष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ सें.मी. इतकी सूट देय राहील.

d) पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांबाबत:- पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस दलातील भरतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल.

(i) उंची :- २.५ सें.मी. पुरुष व महिला उमेदवारांसाठी.

(ii) छाती:- २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून पुरुष उमेदवारांसाठी.

e) बॅण्डस्मन पदाच्या उमेदवारासाठी:

(i) उंची : २.५ सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(ii) छाती : २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून.

f) टीप : महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ चा उपनियम २ चा खंड ब चा उपखंड ब मधील (i) व (ii) मध्ये विहित केलेल्या शारिरीक पात्रतेमध्ये सूट देण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

7.6) अन्य अर्हता:

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केल्याबाबतचे शासन आदेशान्वये बॅण्डस्मन **प्रात्यक्षिक चाचणी खालीलप्रमाणे घेण्यात येईल. सदरहू परीक्षा अर्हता परीक्षा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.**

(i) बँड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बँड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.

(ii) पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठीत करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बँड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

(iii) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्यही बजावणे आवश्यक राहिल.

(iv) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील.

7.7) शारीरिक चाचणी:

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची खालीलप्रमाणे ५० गुणांची शारीरिक चाचणी घेतली जाईल :-

i)

| **पुरुष उमेदवार** | **गुण** | | **महिला उमेदवार** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| (क) १६०० मीटर धावणे | २० | | (क) ८०० मीटर धावणे | २० |
| (ख) १०० मीटर धावणे | १५ | | (ख) १०० मीटर धावणे | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (ग) गोळाफेक | १५ | | (ग) गोळाफेक | १५ |
| **एकुण** | **५०** | | **एकुण** | **५०** |

ii)

| पुरुष / तृतीय पंथी उमेदवार | गुण | | महिला तृतीय पंथी: - स्वत: ची लिंग ओळख महिला पुरुष / तृतीय पंथी अशी केलेले उमेदवार | गुण |
|---|---|---|---|---|
| (क) १६०० मीटर धावणे | २० | | (क) ८०० मीटर धावणे | २० |
| (ख) १०० मीटर धावणे | १५ | | (ख) १०० मीटर धावणे | १५ |
| (ग) गोळाफेक | १५ | | (ग) गोळाफेक | १५ |
| **एकुण** | **५०** | | **एकुण** | **५०** |

7.8) लेखी चाचणी:

(i) शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.

(ii) उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.

(iii)लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा दिनांक निश्चित करण्यात येईल.

(iv) **संपूर्ण राज्यभर सर्व पोलीस घटकात एका पदाकरीता एकाच दिवशी लेखी परिक्षा आयोजित करण्यात येणार आहे. अर्जदारांनी ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवूनच आवेदन अर्ज पूर्ण विचारांती भरावा.**

(v) लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:-

a) अंकगणित;
b) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी;
c) बुध्दीमत्ता चाचणी;
d) मराठी व्याकरण

(vi) वरील पदाकरिता शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रीत गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार अंतिम निवड यादी / प्रतीक्षा यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करुन प्रसिद्ध करण्यात येईल. (उदा.गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पोलीस -१८१९/प्र.क्र ३१६/पोल-५ अ, दिनांक १०.१२.२०२० नुसार).

## 8) सशस्त्र पोलीस शिपाई: -

8.1) महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ मधील व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार गृह विभागाच्या अधिपत्याखालील राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (गट-क) पदे भरण्यासाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

8.2) ज्या घटकात पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, त्याची नावे पुढीलप्रमाणे आहेत :-

| | |
|---|---|
| (१)समादेशक, रा.रा.पो.बल, गट-१, पुणे | २) गट-२, पुणे, |
| (३) गट-४, नागपूर, | ४) गट-५, दौंड |
| (५) गट-६,धुळे | (६)गट-७, दौंड |
| (७) गट-१३, नागपूर | (०८) गट-१५, गोंदिया |
| (०९) गट-१६, कोल्हापूर | (१०) गट-१७, चंद्रपूर |

| | |
|---|---|
| ११)गट-१८, काटोल, नागपूर | (१२) गट-१९, कुसडगांव, अहमदनगर |
| (१३) गट-२०,वरणगांव जळगांव | |

8.3) सेवा प्रवेश नियम:

(i) महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी खालील सेवाप्रवेश नियम लागू राहतील.

(ii) राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष) (सेवा प्रवेश) नियम-२०१२ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह.

वर नमूद सेवा प्रवेश नियम सुधारणांसह www.policerecruitment2025.mahait.org व www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

8.4) वयोमर्यादा:

अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक ३०.११.२०२५ रोजी किमान व कमाल वयोमर्यादा खालील प्रमाणे राहील:-

(i)

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | खुला | १८ वर्षे | २५ वर्षे |
| २. | मागास प्रवर्ग (अ.जाती, अ.जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र., इ.मा.व., एस.ई.बी.सी., इ.डब्ल्यू.एस.) | १८ वर्षे | ३० वर्षे |
| ३. | प्रकल्पग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ४. | भूकंपग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ५. | माजी सैनिक उमेदवार | १८ वर्षे | उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी सूट राहील. |
| ६. | अंशकालीन पदवीधर उमेदवार | १८ वर्षे | ५५ वर्षे |
| ७. | अनाथ | १८ वर्षे | ३० वर्षे |

(ii)समांतर आरक्षणांतर्गत येणारे उमेदवार

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | खुला वर्ग | मागास प्रवर्ग |
| १. | खेळाडू उमेदवार | १८ वर्षे | २५+५ वर्षे | ३०+५ वर्षे. |
| २. | पोलीस पाल्य | १८ वर्षे | २५ वर्षे | ३० वर्षे |
| ३. | गृहरक्षक | १८ वर्षे | २५ वर्षे | ३० वर्षे |
| ४. | माजी सैनिकावर अवलंबून असलेले (मुलगा ) उमदेवार | १८ वर्षे | २५+३ वर्षे | ३०+३ वर्षे |

**टिप :- शासन आदेश क्र.पोलीस-११२५/प्र.क्र.१७३/पोल-५ अ, दिनांक १७/१०/२०२५ अन्वये दिनांक ०१ जानेवारी २०२२ पासून सुरु होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गाचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदासाठी सन २०२४ व २०२५ या कॅलेंडर वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेकरीता, एक वेळची उपाययोजना म्हणून पात्र असतील.**

8.5) शैक्षणीक अर्हता:

(i) महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकंडरी स्कूल परीक्षा तसेच

सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परीक्षा ह्या राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत) (१२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्षबाबतचे गृह विभाग शासन पत्र क्र. आरसीटी-०३०५/ सीआर-२६६/पोल-५अ, दिनांक २९/०६/२००५ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांनुसार).

(ii) समकक्षबाबत

a) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक (विद्यापिठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला वा यशवंतराव मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार) (शासन निर्णय क्र. साप्रवि आरजीडी १५/११/प्र.क्र.८९/१३, दिनांक २०/५/२०११ )

b) विद्यापीठे, मानीव विद्यापीठे, ऐच्छिक मान्य शैक्षणिक संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवीका समकक्षमता (महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचेकडील क्र. समक १०९९/प्र.क्र.१३४/मशि-३, दिनांक १४/६/१९९९ व समक १०९९/१३४/मशि-६, दि.२८/२/२००७)

c) व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाने ०२ वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणासाठी २ स्तराची समकक्षता निश्चित केलेले (महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचकडील क्र. व्हीओसी २०१२/५९१/प्र.क्र.२४५ (अ) / व्यशि-४, दिनांक २८/९/२०१२ व महाराष्ट्र शासन शाळेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. ओप्रशि२०१८/प्र.क्र.११०/एसडी-३, दिनांक २७/९/२०१८)

e) डिप्लोमा इन मेकेलिकल इंजिनियरिंग (महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शसन निर्णय क्र. एसएससी २००५/(१४९)०५-उमाशि-२, दिनांक २०/६/२००५ च्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा शिक्षण यांचेकडील पत्र क्र. एसएससी २०१०/६ (६६/१०)/उमाशि-२, दिनांक २९/४/२०१० व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार).

(iii) माजी सैनिक: १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण असणाऱ्यांच्या बाबतीत नागरी परीक्षा इयत्ता १० वी उत्तीर्ण किंवा IASC (Indian Army Special Certificate of Education) प्रमाणपत्र व १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण नसलेल्यांच्या बाबतीत इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(iv) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद: शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत ते भरतीकरता पात्र ठरतील.

8.6) शारीरिक पात्रता:

i)

| | **पुरुष उमेदवारांकरिता** |
|---|---|
| अ) उंची | १६८ से.मी. पेक्षा कमी नसावी. |
| ब) छाती | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा. |

ii) सूट:

a) महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश ) नियम २०१२ यांच्या नियम ३ मध्ये, पोट नियम (२) मधील (१)खंड (अ), मध्ये, उपखंड (२) मधील , परिच्छेद (अ) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल- **जे उमेदवार, आवश्यक पात्रता शर्तीची पुर्तता करतात अशा अनुसूचित जमातीतील उमेदवारांना आवश्यक असलेल्या उंचीमध्ये ५ सेटीमीटर इतकी शिथिलता देण्यात येईल.**

b) शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल:

i) उंची :- २.५ सें.मी.

c) टीप: महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम, २०१२ मधील नियम ३ चा उपनियम २ चा उपखंड (अ)(२) नुसार विहित केलेल्या शारिरीक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील उमदेवारांच्या बाबतीत वरीलप्रमाणे शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

d) खेळाडू उमेदवारासाठी: आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरुष खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ सें.मी. इतकी सूट देय राहील.

e) राज्य राखीव पोलीस बलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांबाबत: राज्य राखीव पोलीस बलातील बेपत्ता कर्मचारी किंवा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे अशा कर्मचाऱ्याच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस बलातील भरतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल.

ii)उंची :- २.५ सें.मी.

iii)छाती:- २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून.

8.7) अन्य अर्हता:

i) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जूलै, २००५ अन्वये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये गट अ, ब, क आणि ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे अनिवार्य आहे.

ii) मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक: माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

iii) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ मंत्रालय मुंबई ३२, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार सदरील पदासाठी संगणक अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

iv) शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दिनांक ४.२.२०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्रधारक असावा.

v) शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

vi) नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तसेच, मुंबई राज्य राखीव पोलीस बल अधिनियम, १९५१ व मुंबई राज्य राखीव पोलीस बल नियम, १९५९ मधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

vii) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू राहील. तथापि, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन, वित्त विभाग निर्णय क्र.अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दिनांक २१ ऑगस्ट २०१४ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)" या नावाने लागू होईल.

viii) राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता. वडसा (देसाईगंज) जि गडचिरोली करिता गृहविभाग अधिसूचना दिनांक ०२.०८.२०१९ अन्वये गडचिरोली जिल्हयातील राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, मुख्यालय, वडसा देसाईगंज, जि. गडचिरोली मधील सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये आवेदन सादर करणाऱ्या उमेदवाराला अतिरिक्त १०० गुणांची

गोंडी आणि माडीया भाषेची लेखी चाचणी परीक्षा दयावी लागेल. असे उमेदवार राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता. वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली मधून १५ वर्षे आंतर गट बदली पात्र असणार नाही.

8.8) शारीरिक चाचणी:

i) महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची खालीलप्रमाणे १०० गुणांची शारीरिक चाचणी घेतली जाईल.

ii)

| पुरुष उमेदवार | गुण |
|---|---|
| (अ) ५ कि.मी. धावणे | ५० |
| (ब) १०० मीटर धावणे | २५ |
| (क) गोळाफेक | २५ |
| एकुण | १०० |

8.9) लेखी चाचणी:

(i) शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.

(ii) उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.

(iii)लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा दिनांक निश्चित करण्यात येईल. **राज्य राखीव पोलीस बलातील सर्व गटाच्या भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा ही एकाच दिवशी घेण्यात येईल.**

(iv)लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:-

a) अंकगणित;
b) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी;
c) बुध्दीमत्ता चाचणी;
d) मराठी व्याकरण

(v) वरील पदाकरिता शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रीत गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार अंतिम निवड यादी / प्रतीक्षा यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करुन प्रसिद्ध करण्यात येईल. (उदा.गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पोलीस -१८१९/प्र.क्र ३१६/पोल-५ अ, दिनांक १०.१२.२०२० नुसार).

## 9) कारागृह शिपाई:

9.1) कारागृह शिपाई भरती घटकांची नावे:

(१) कारागृह, मुंबई (२) कारागृह, पुणे (३) कारागृह, नागपूर (४) कारागृह, नाशिक

9.2) सेवा प्रवेश नियम:

(i) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/१५/तुरुंग-१, दिनांक ६.११.२०१५ नुसार कारागृह विभागातील कारागृह शिपाई (गट-क) ही पदे पोलीस विभागामार्फत भरण्यात येतात. सदरहू पदासाठी महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणांसह.

(ii)वर नमूद सेवाप्रवेश नियम सुधारणांसह www.policerecruitment2025.mahait.org व www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

9.3) वयोमर्यादा:

अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक ३०.११.२०२५ रोजी किमान व कमाल वयोमर्यादा खालील प्रमाणे राहील:-

(i)

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | खुला | १८ वर्षे | २८ वर्षे |
| २. | मागास प्रवर्ग (अ.जाती, अ.जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र., इ.मा.व., एस.ई.बी.सी, इ.डब्ल्यू.एस.) | १८ वर्षे | ३३ वर्षे |
| ३. | प्रकल्पग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ४. | भूकंपग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ५. | माजी सैनिक उमेदवार | १८ वर्षे | उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. |
| ६. | पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | १८ वर्षे | ५५ वर्षे |
| ७. | अनाथ | १८ वर्षे | ३३ वर्षे |

(ii) समांतर आरक्षणांतर्गत येणारे उमेदवार

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | खुला वर्ग | मागास प्रवर्ग |
| १. | महिला उमेदवार | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| २. | खेळाडू उमेदवार | १८ वर्षे | २८+५ वर्षे | ३३+५ वर्षे. |
| ३. | पोलीस पाल्य | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ४. | गृहरक्षक | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ५. | माजी सैनिकावर अवलंबून असलेले (मुलगा, मुलगी, पत्नी) उमदेवार | १८ वर्षे | २८+३ वर्षे | ३३+३ वर्षे |

**टिप :- शासन आदेश क्र.पोलीस-११२५/प्र.क्र.१७३/पोल-५ अ, दिनांक १७/१०/२०२५ अन्वये दिनांक ०१ जानेवारी २०२२ पासून सुरु होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणाऱ्या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गाचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदासाठी सन २०२४ व सन २०२५ या कॅलेंडर वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेकरीता, एक वेळची उपाययोजना म्हणून पात्र असतील.**

9.4) शैक्षणीक अर्हता:

(i) महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकंडरी स्कूल परीक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परीक्षा ह्या राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत) (१२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्षबाबतचे गृह विभाग शासन पत्र क्र. आरसीटी-०३०५/ सीआर-२६६/पोल-५अ, दिनांक २९/०६/२००५ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांनुसार).

(ii) समकक्षबाबत

a) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक (विद्यापिठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला वा यशवंतराव मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार) (शासन निर्णय क्र. साप्रवि आरजीडी १५/११/प्र.क्र.८९/१३, दिनांक २०/५/२०११ )

b) विद्यापीठे, मानीव विद्यापीठे, ऐच्छिक मान्य शैक्षणिक संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवीका समकक्षमता (महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचेकडील क्र. समक १०९९/प्र.क्र.१३४/मशि-३, दिनांक १४/६/१९९९ व समक १०९९/१३४/मशि-६, दि.२८/२/२००७)

c) व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाने ०२ वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणासाठी २ स्तराची समकक्षता निश्चित केलेले (महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचकडील क्र. व्हीओसी २०१२/५९१/प्र.क्र.२४५ (अ) / व्यशि-४, दिनांक २८/९/२०१२ व महाराष्ट्र शासन शाळेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. ओप्रशि२०१८/प्र.क्र.११०/एसडी-३, दिनांक २७/९/२०१८)

d) डिप्लोमा इन मेकेलिकल इंजिनियरिंग (महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शसन निर्णय क्र. एसएससी २००५/(१४९)०५-उमाशि-२, दिनांक २०/६/२००५ च्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा शिक्षण यांचेकडील पत्र क्र. एसएससी २०१०/६ (६६/१०)/उमाशि-२, दिनांक २९/४/२०१० व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार).

(iii) माजी सैनिक: १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण असणाऱ्यांच्या बाबतीत नागरी परीक्षा इयत्ता १० वी उत्तीर्ण किंवा IASC (Indian Army Special Certificate of Education) प्रमाणपत्र व १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण नसलेल्यांच्या बाबतीत इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(iv) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद: शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत ते भरतीकरता पात्र ठरतील.

9.5) शारीरिक पात्रता:

i)

| | **महिला उमेदवारांकरिता** | **पुरुष उमेदवारांकरिता** | **तृतीय पंथी (ट्रान्सजेंडर)** |
|---|---|---|---|
| अ) उंची | १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी | १६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. | (अ) स्वत:ची लिंग ओळख महिला / तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तींसाठी :- १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी<br>(ब) स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या व्यक्तीसाठी<br>१६५ से.मी. पेक्षा कमी नसावी. |
| ब) छाती | ----- | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा. | स्वत:ची लिंग ओळख महिला / पुरुष / तृतीय पंथी अशी केलेल्या व्यक्तीसाठी आवश्यक नाही. |

ii) सूट:

a) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश ) नियम २०११ यांच्या नियम ३ मध्ये, पोट नियम (२) मधील (१)खंड (अ), मध्ये, उपखंड (ब) मधील , परिच्छेद (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल- **जे उमेदवार, आवश्यक पात्रता शर्तीची पुर्तता करतात अशा अनुसूचित जमातीतील उमेदवारांना आवश्यक असलेल्या उंचीमध्ये ५ सेटीमीटर इतकी शिथिलता देण्यात येईल**.

b) शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल:

(i) **उंची :** ४.० सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(ii) **छाती :** छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.

c) टीप: महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ चा उपखंड (क) नुसार विहित केलेल्या शारिरीक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील उमदेवारांच्या बाबतीत

वरीलप्रमाणे शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

d) खेळाडू उमेदवारासाठी: आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरुष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ सें.मी. इतकी सूट देय राहील.

e) पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांबाबत: पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस दलातील भरतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल.

**(i) उंची :**- २.५ सें.मी. पुरुष व महिला उमेदवारांसाठी.
**(ii) छाती:**- २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून पुरुष उमेदवारांसाठी.

9.6) **शारीरिक चाचणी**:

कारागृह शिपाई यांची भरती ही महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवा प्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार होत असल्याने कारागृह शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची खालीलप्रमाणे ५० गुणांची शारीरिक चाचणी घेतली जाईल :-

(i)

| पुरुष उमेदवार | गुण | | महिला उमेदवार | गुण |
|---|---|---|---|---|
| (क) १६०० मीटर धावणे | २० | | (क) ८०० मीटर धावणे | २० |
| (ख) १०० मीटर धावणे | १५ | | (ख) १०० मीटर धावणे | १५ |
| (ग) गोळाफेक | १५ | | (ग) गोळाफेक | १५ |
| **एकुण** | **५०** | | **एकुण** | **५०** |

(ii)

| पुरुष / तृतीय पंथी उमेदवार | गुण | | महिला तृतीय पंथी: - स्वत: ची लिंग ओळख महिला पुरुष / तृतीय पंथी अशी केलेले उमेदवार | गुण |
|---|---|---|---|---|
| (क) १६०० मीटर धावणे | २० | | (क) ८०० मीटर धावणे | २० |
| (ख) १०० मीटर धावणे | १५ | | (ख) १०० मीटर धावणे | १५ |
| (ग) गोळाफेक | १५ | | (ग) गोळाफेक | १५ |
| **एकुण** | **५०** | | **एकुण** | **५०** |

9.7) **लेखी चाचणी**:

(i) शारीरिक चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरीता बोलाविण्यास पात्र असतील.

(ii) उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.

(iii) लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील. मैदानी चाचणी पार पडल्यानंतर लेखी परीक्षा घेण्याबाबतचा दिनांक निश्चित करण्यात येईल.

(iv) **संपूर्ण राज्यभर सर्व पोलीस घटकात एका पदाकरीता एकाच दिवशी लेखी परिक्षा आयोजित करण्यात येणार आहे. अर्जदारांनी ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवूनच आवेदन अर्ज पूर्ण विचारांती भरावा.**

(v) लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:-

a) अंकगणित;
b) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी;
c) बुध्दीमत्ता चाचणी;
d) मराठी व्याकरण

9.8) वरील पदाकरिता शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रीत गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार अंतिम निवड यादी / प्रतीक्षायादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करुन प्रसिद्ध करण्यात येईल. (उदा.गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पोलीस -१८१९/प्र.क्र ३१६/पोल-५ अ, दिनांक १०.१२.२०२० नुसार).

10) **पोलीस शिपाई / पोलीस शिपाई चालक / बॅण्डस्मन / राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई / कारागृह शिपाई या पदांकरीता सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतच्या सूचना:-**

10.1) **सामाजिक आरक्षण:-**

(i) विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, एसईबीसी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी मूळ कागदपत्र तपासणी वेळी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **लगतच्या आर्थिक वर्षाचे म्हणजे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे** मूळ नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non-Creamy Layer Certificate) सादर करावे. शासन शुध्दीपत्रक, इतर समाज बहुजन कल्याण विभाग क्रमांक संकीर्ण २०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ९ मार्च २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी कालावधीत विचारात घेण्यात येईल. परंतु संवर्गाकरिता २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे **अनिवार्य** राहील.

(ii) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक: बीसीसी-२०११/प्र.क्र.२६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये ज्या उमेदवारांची निवड मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे. अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासणीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील.

(iii) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : राधाओ-४०१९ /प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ अन्वये विहीत करण्यात आलेले मूळ प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

10.2) **समांतर आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी:**

(i) उमेदवार ज्या समांतर आरक्षणासाठी दावा करु इच्छितो, त्या समांतर आरक्षणाच्या दाव्याबाबत आवेदन अर्जामध्ये स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. आवेदन अर्ज सादर केल्यानंतर सुरु होणाऱ्या भरती प्रक्रिये दरम्यान व त्यानंतरही उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा आरक्षणाबाबतचा अन्य दावा करता येणार नाही.

(ii) महिलांसाठी:

a) महिलांची आरक्षीत पदे शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक ८२/ २००१/मसेआ-२००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५.५.२००१ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील. महिला उमेदवार ही महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. महिलांकरिता ३०% समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील. महिला आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या महिला उमेदवारांनी आवेदन अर्जातील संबंधित रकान्यात महिला आरक्षणाचा लाभ घेत असल्याबाबत स्पष्टपणे दावा केल्या नसल्यास याबाबत उमेदवारांना नंतर बदल करता येणार नाही.

b) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्रमांक महिआ २०२३/प्र.क्र.१२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे २०२३ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवार्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य

प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेआर प्रमाणपत्र सादर करण्यातबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

c) महिलांसाठी आरक्षित असलेली पदे संबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

(iii) खेळाडूंसाठी:

a) राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमाक राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ व शासन निर्णय क्रमांक खेआक्ष-२७२५/प्र.क्र.९७/क्रीयुसे-२, दिनांक ०१.०७.२०२५ मधील विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पात्र उमेदवारांमधून भरती करण्यात येईल. खेळाडूंसाठी ५% समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२ / प्र.क्र. ६८ / क्रीयुसे-२, दिनांक **११.०३.२०१९** मधील अ.क्र. ४ नुसार दिनांक ०१.०७.२०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ६ मधील अनुक्रमांक (viii) मधील तरतुद सदर शुध्दीपत्रकान्वये रद्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शुध्दीपत्रकातील अ.क्र. ३. (IX) नुसार क्रीडा अर्हतेनुसार संबंधित पदाच्या भरतीसाठी जाहिरात आल्यास अर्ज करताना खेळाडूने उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणी करुन मिळण्याबाबत केलेल्या अर्जाची पोच पावती अथवा या पूर्वी खेळाडूस उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्राप्त झालेला प्रमाणपत्र पडताळणी अहवाल जोडणे बंधनकारक आहे. अर्जासोबत उपरोक्त तपशील सादर न करणाऱ्या उमेदवारांचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

b) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ मधील तरतुदींनुसार व तद्नंतर यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील. खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात आली आहे.

c) शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट २०१६ मधील तरतुदीनुसार खेळाडू आरक्षणाकरीता क्रिमीलेअरची अट लागू राहणार नाही. तसेच त्या त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

d) उमेदवाराने त्यांची खेळविषयक सर्व प्रमाणपत्रे एकाचवेळी सादर करणे आवश्यक राहील. खेळाडु प्रवर्गातून सदर भरतीसाठी अर्ज करतांना दिनांक ०१.०७.२०१६ व दिनांक ०१.०७.२०१५ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या स्पर्धा व खेळ पात्र असल्याबाबत / खेळाडू योग्यता प्रमाणपत्र बरोबर असल्याबाबत उमेदवाराने स्वत: खात्री करुनच अर्ज सादर करावा. कोणत्याही टप्प्यावर खेळाडूविषयक विहित पात्रता पूर्ण करत नसल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

(iv) प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त आरक्षण:

a) शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ अन्वये प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त ५% व भूकंपग्रस्त २% अन्वये समांतर आरक्षणाची सवलत देण्यात आली आहे. त्याचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी त्याबाबत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र, तसेच उक्त प्रमाणपत्रावर उमेदवाराचे संपूर्ण नाव असणे आवश्यक आहे. तसेच सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

(v) माजी सैनिकांसाठी:

a) भूदल, नाविक दल व हवाईदल सेवेमध्ये सहा माहिने व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल याप्रमाणे संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक एमआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६.३.१९९९ मधील तरतुदींनुसार माजी सैनिकांसाठी १५% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. युध्द काळात किंवा युध्दात नसतांना सैनिकी सेवेत मृत पावलेल्या किंवा अपंगत्व येऊन नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबाच्या एका व्यक्तीस, शासन निर्णय, साप्रवि क्र. आरटीए १०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दिनांक २/९/१९८३ व शासन आरटीए -१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दिनांक २२/४/१९८८ मधील तरतूदीनुसार शासकीय सेवेत भरतीकरिता प्राधान्य देय आहे. तसेच शासन परिपत्रक साप्रवि क्र. न्याया-२०१४/कोर्ट-९ (प्र.क्र.२४४/१४) २८, दिनांक ११/९/२०१४ नुसार माजी केंद्रीय हत्यारी पोलीस दल (Ex-CAPF) ह्या दलातील माजी सैनिकांच्या सोयी सुविधा लागू नाहीत.

(vi) अंशकालीन कर्मचारी:

a) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/ २००९/१६-अ, दिनाक २७.१०.२००९ अन्वये सुशिक्षीत रोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना गट क पदामधील सरळसेवेच्या करावयाच्या नियुक्तीसाठी १०% समांतर आरक्षण ठेवण्यात आले होते. सदरहू आरक्षणापैकी ५% आरक्षण हे शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५अ, दिनांक २२.८.२०१४ अन्वये पोलीस पाल्यांसाठी वर्ग केले असल्याने पोलीस भरतीमध्ये पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी ५% आरक्षण देय आहे.

(vii) पोलीस पाल्य:

a) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५अ, दिनांक २२.८.२०१४ मधील तरतुदीं व शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक पोलीस-१८१५/प्र.क्र.३०६/पोल-५अ, दिनांक १६.२.२०१६ मधील मार्गदर्शनानुसार पोलीस दलातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी ३ टक्के पदे पोलीस भरतीत राखीव ठेवण्यात येत आहेत.

(viii) गृहरक्षक / होमगार्ड आरक्षण:

a) पोलीस शिपाई / बॅण्डस्मन / पोलीस शिपाई चालक / सशस्त्र पोलीस शिपाई / कारागृह शिपाई पदांवर नियुक्ती करतांना एकूण पदांच्या ५% पदे ही होमगार्डमध्ये जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात कमीत कमी ३ वर्षे (१०९५दिवस) एकत्रित सेवा झालेल्या व सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक शैक्षणिक व शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या, विहित वयोमर्यादेतील उमेदवारांसाठी समांतर आरक्षणांतर्गत राखीव आहेत. जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात ३ वर्षे (१०९५ दिवस) सेवा पूर्ण नसलेल्या उमेदवारास गृहरक्षक पदाचे आरक्षण लाभ देय होणार नाही. तसेच, जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात ३ वर्षे (१०९५ दिवस) एकत्रित सेवा पूर्ण केल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचा म्हणजेच समादेशक यांचा दाखला / प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

(ix) अनाथ व्यक्तींचे आरक्षण:

a) शासन निर्णय क्रमांक अनाथ २०२२/प्र.क्र.१२२का-०३, दिनांक ०६.०४.२०२३ मधील तरतुदीनुसार अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदासाठी अर्ज करतांना उमेदवाराकडे, महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र उमदेवाराने कागदपत्र छाननीचेवेळी पडताळणी समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. १ % अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या उमदेवाराची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने / तिने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची तपासणी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्यामार्फत करणे आवश्यक राहील.

(x) समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य, प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ व १६/३/१९९९ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(xi) शासकिय निमशासकीय कर्मचारी यांना वयोमर्यादेत कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. सदरील पद भरतीकरीता घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांचे कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अर्ज भरणे आवश्यक राहील. परवानगीची प्रत, कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करावी. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

(xii) समान गुण आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य- शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५ अ, दिनांक १०.१२.२०२० मधील तरतुदींनुसार लेखी परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांस प्रथम प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी, संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य म्हणून पात्र ठरविल्याबाबतचा पुरावा साक्षांकित प्रतीसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

(xiii) इतर अटी:

a) पोलीस शिपाई / बॅण्डस्मन / पोलीस शिपाई चालक / सशस्त्र पोलीस शिपाई / कारागृह शिपाई या पदासाठी निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्तीपुर्वी वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी करण्यात येईल. सदरहू दोन्ही चाचण्यांमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारास पोलीस शिपाई / बॅण्डस्मन / पोलीस शिपाई चालक / सशस्त्र पोलीस शिपाई या पदावर नियुक्ती देण्यात येईल. ज्या उमेदवाराचा चारित्र्य पडताळणी अहवाल आक्षेपार्ह असल्यास संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही व अशा प्रकरणी शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोलीस-१८१७/प्र.क्र.२११/पोल-५अ, दिनांक १९.७.२०१७ व पोलीस-१७१८/प्र.क्र २११/पोल-५ अ, दिनांक ३०.०९.२०२२ मधील तरतुदींनुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

b) शैक्षणिक अर्हता व इतर अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

c) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३(२)(ब) या नियमाच्या खंड (क) चा उपखंड (i) नुसार बँड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बँड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यामुळे शारीरिक चाचणीत उत्तीर्ण झालेल्या बॅन्डस्मन उमेदवारांची प्रात्यक्षिक चाचणी (Musical Test) घेतली जाईल. सदरहू चाचणी अर्हता चाचणी असेल. सदरहू प्रात्यक्षिक चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच, त्यांना लेखी व शारिरीक चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर गुणवत्तेनुसार बॅन्डस्मन पदासाठी निवड केली जाईल. सेवाप्रवेश नियमातील इतर अटी शर्ती बॅन्डस्मन पदावर निवड झालेल्या उमेदवारास लागू राहतील.

d) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/१५/तुरुंग-१, दिनांक ६.११.२०१५ नुसार कारागृह विभागातील कारागृह शिपाई (गट-क) ही पदे पोलीस विभागामार्फत भरण्यात येतात. सदरहू पदासाठी महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणांसह लागू आहेत. इच्छूक उमेदवारांनी वर नमूद केल्याप्रमाणे आवेदन अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत.

(xiv) अधिवास प्रमाणपत्र:

a) उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मकसी १००७/प्रक्र३६/ का.३६, दिनांक १०.०७.२००८ मधील तरतूदीनुसार ते

सदर परिपत्रकात नमूद ८६५ गावातील १५ वर्षाचे वास्तव्य असल्याबाबतचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील. **गडचिरोली जिल्ह्याकरिता उमेदवारास गडचिरोली जिल्ह्यांचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.**

11) **विशेष सूचना:**

11.1) ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती आणि कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यातील माहिती यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल तसेच उमेदवाराने मागितलेले सामाजिक/ समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथील करणे इत्यादी मधील बदल/ सवलती नामंजूर करण्यात येतील.

11.2) लेखी परीक्षे दरम्यान परीक्षा कक्षात किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

11.3) कागदपत्र पडताळणीच्या वेळी प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रियेसाठी अपात्र केले जाईल.

11.4) जाहिरातीतील नमुद केलेले सर्व शासन निर्णय/ अधिसूचना / शासन परिपत्रके ही महाराष्ट्र शासनाच्या www.policerecruitment2025.mahait.org व www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

12) **महत्वाची टिप**

12.1) **उमेदवारांकडे आधारकार्ड लिंक असलेला मोबाईल असणे आवश्यक आहे, नसल्यास प्रथम त्यांनी त्यांचे आधारकार्ड मोबाईल क्रमांकवर लिंक करुन घेण्यात आल्यानंतरच आवेदन अर्ज सादर करावा, याबाबतचा सविस्तर तपशील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

12.2) **ऑनलाईन आवेदन अर्ज भरतानाच वैध कालावधीची प्रमाणपत्रे उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रावरील उमेदवाराचे स्वत:चे नांव, शिक्का, जात प्रवर्ग, निर्गमित दिनांक, सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी इ. बरोबर असल्याची खात्री उमेदवारांने स्वत: करावी. आवश्यक प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास किंवा अपूर्ण असल्यास किंवा अवैध असल्यास सदरहू उमेदवारास भरती प्रक्रियेतून कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल व त्याबाबत कोणताही दावा / तक्रार करण्यास उमेदवारास कोणताही हक्क राहणार नाही.**

12.3) ऑनलाईन आवेदन अर्ज भरतानाच वैध कालावधीची प्रमाणपत्रे उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रावरील उमेदवाराचे स्वत:चे नांव, शिक्का, जात प्रवर्ग, निर्गमित दिनांक, सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी इ. बरोबर असल्याची खात्री उमेदवारांने स्वत: करावी. आवश्यक प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास किंवा अपूर्ण असल्यास किंवा अवैध असल्यास सदरहू उमेदवारास भरती प्रक्रियेतून कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल व त्याबाबत कोणताही दावा / तक्रार करण्यास उमेदवारास कोणताही हक्क राहणार नाही.

12.4) **उमेदवार एका पदाकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो**. **एका पदासाठी एकापेक्षा जास्त आवेदन अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात येतील.**

12.5) **अर्जदारास पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, समादेशक यांच्या आस्थापनेवरील १) पोलीस शिपाई; २) पोलीस शिपाई चालक; ३) बॅण्डस्मन ४) राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई; ५) कारागृह शिपाई अशा एकूण ५ पदांकरीता प्रत्येक पदाकरीता फक्त एक याप्रमाणे पाच स्वतंत्र आवेदन अर्ज दाखल करता येऊ शकतील. त्यासाठी उमेदवारांस प्रत्येक पदासाठी स्वतंत्ररित्या आवेदन अर्ज सादर करणे बंधनकारक आहे व त्याप्रमाणे प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र परिक्षा शुल्क भरावे लागेल.**

12.6) उमेदवाराने चुकीची / खोटी माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.

12.7) उमेदवारांनी जाहीरात काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

12.8) उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत. ज्या उमेदवारांना सामाजिक आरक्षण अनुज्ञेय आहे अशा उमेदवारांनी ईडब्ल्यूएस मधून आवेदन अर्ज सादर करता येणार नाही.

12.9) भरती प्रक्रिये दरम्यान शारीरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये उमेदवार गैरहजर राहिल्यास त्यास भरती प्रक्रियेतन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्‍चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.

12.10) भरती प्रक्रिया परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदाच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार संबंधित पोलीस घटक प्रमुखांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही. त्याचप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांचा शासन विहित नियमानुसार विचार केला जाईल. सदर भरती प्रक्रियेसंबंधात वाद, तक्रारी उद्‌भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित पोलीस घटक कार्यालयाच्या भरती प्रक्रियेत नेमणूक करण्यात आलेल्या अपिलीय अधिकारी यांना राहील.

12.11) भरती प्रक्रिया सुरु असतांना किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे / प्रमाणपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा निवड होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच विहित अर्हता / निकषांची पुर्तता करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रद्द करण्यांत येईल. त्याबाबत कोणताही दावा / तक्रार करण्यास कोणताही हक्क राहणार नाही.

12.12) उमेदवाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा अथवा खटला दाखल असेल तर त्या गुन्हयाच्या / खटल्याच्या प्रकरणातील सद्यस्थितीची माहिती देणे / उघड करणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही स्वरुपाच्या गुन्हयातून / खटल्यातून मुक्तता झाली असल्यास त्याबाबत सुध्दा माहिती देण्यात यावी. उमेदवाराने खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास सदरहू उमेदवारास भरती प्रक्रियेतून कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल व त्याबाबत कोणताही दावा / तक्रार करण्यास कोणाताही हक्क राहणार नाही.

12.13) एच.एस.सी. प्रमाणपत्र अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करावेत. नाव बदललेले असल्यास अथवा प्रमाणपत्रावरील नावांत कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, संबंधित बदलासंदर्भातील राजपत्रातील प्रत, कागदपत्र व संबंधित ओळखपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावेत.

12.14) वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्गीय तसेच महिला, माजी सैनिक, खेळाडू, गृहरक्षक दल, अंशकालीन उमेदवार प्रकल्प / भुकंपधारक / पोलीस पाल्य / अनाथ इत्यादी संदर्भात न चुकता स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधीत रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधीत दाव्याचा अराखीव सर्वसाधारण प्रवर्गात विचार केला जाईल.

12.15) अंतिम निवडसुचीमध्ये समाविष्ट झालेल्या उमेदवारांची कागदपत्र / प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येईल. **जात वैधता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे ही आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंतची असणे आवश्यक आहे.** प्रमाणपत्रांच्या छाननीच्या वेळी लागू असलेल्या प्रमाणपत्रांची मूळप्रत (Original) व सुस्पष्ट दिसतील अशा साक्षांकित केलेल्या दोन छायांकित प्रती उमेदवाराने कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. **सदरवेळी मूळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.**

12.16) उमेदवाराने पोलीस भरतीकरिता येताना शारीरिक व लेखी चाचणीसाठी त्यास देण्यात येणारे प्रवेशपत्र सोबत आणावे. विहित नमुन्यातील पोलीस भरती प्रवेश पत्राशिवाय पोलीस भरतीच्या कोणत्याही टप्प्यावरील चाचणीस / तपासणीस प्रवेश दिला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन विचारात घेतले जाणार नाही.

12.17) काही उमेदवार मागासवर्गीय असूनही खुला प्रवर्ग (Unreserved) म्हणून अर्ज सादर करतात. परंतु कागदपत्र पडताळणीच्या वेळी जातीचे प्रमाणपत्र / नॉन क्रिमेलिअर प्रमाणपत्र सादर करुन मागास प्रवर्गाचे लाभ मिळण्याबाबत अर्ज सादर करतात. यास्तव ऑन लाईन अर्ज सादर करण्यापूर्वीच **(संबंधीत पोलीस घटकाच्या आस्थापनेवर त्या मागास प्रवर्गासाठी पदे रिक्त असल्याबाबत खात्री करुन)** त्यांनी कोणत्या प्रवर्गातून अर्ज भरावयाचा आहे हे निश्चित करुन नंतरच ऑनलाईन अर्जात तशी माहिती नोंद करावी व संबंधित प्रवर्गाचा निर्विवाद दावा अर्ज भरताना करावा. अर्ज सादर केल्यानंतर प्रवर्ग बदलण्याबाबत उमेदवारांकडून अभिवेदन अथवा दावा / तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

12.18) कागदपत्र पडताळणीदरम्यान सादर करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रावर संपूर्ण नाव, आवश्यक प्रमाणपत्राचा निर्गमित दिनांक, जात प्रमाणपत्र असल्यास जात व जातीचे वर्गीकरण [SC, ST, , VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, OBC, SEBC & EWS] स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहेत. जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमेलियर प्रमाणपत्र विहित नमुन्यातील असावे.

12.19) मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले स्वतंत्र जातप्रमाणपत्र व स्वतंत्र नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अ.जा. व अ.ज. प्रवर्ग वगळून) सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर न करणाऱ्या उमेदवारास जात प्रवर्गाचा / समांतर आरक्षणाचा लाभ मिळू शकणार नाही. तसेच ज्या उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र नसतील तर असे उमेदवार इच्छुक असल्यास खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवार म्हणून अटी व शर्तीच्या अधिन राहुन ऑनलाईन अर्ज सादर करु शकतील.

12.20) उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या त्या त्या टप्प्याबाबत SMS किंवा E-Mail द्वारे माहिती दिली जाईल तसेच त्यांनी अधिकृत संकेतस्थळावरुन वेळोवेळी माहिती प्राप्त करुन घ्यावी.

12.21) आवेदन अर्ज सादर करताना ज्या सामाजिक / समांतर आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी विनंती केली असेल, त्याच सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतची प्रमाणपत्रे विचारात घेण्यात येतील, कागदपत्र पडताळणीच्या वेळी अन्य कोणत्याही सामाजिक / समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र विचारात घेतले जाणार नाही. तसेच, याबाबत आवेदन अर्जात कोणताही बदल करता येणार नाही अथवा आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही. आवेदन अर्जात दावा केल्यानुसार कागदपत्रे सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहिल. त्याबाबतची प्रमाणपत्रे / कागदपत्रे नसल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

12.22) **कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराने, त्यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या आवेदन अर्जाची (ॲप्लीकेशन आयडी नमूद असलेली) प्रत, पोलीस भरतीकरीता देण्यात आलेल्या शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेच्या प्रवेशपत्रांची प्रिंट व २ पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे आवश्यक आहे.**

12.23) **पोलीस शिपाई / बॅण्डस्मन/ पोलीस शिपाई चालक / सशस्त्र पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी / पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल व वैद्यकीय तपासणीत पात्र असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय नियुक्ती देण्यात येणार नाही.**

12.24) **ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना / पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वत: घ्यावी.**

12.25) रोजगार व स्वयंरोजगार सेवायोजन कार्यालयात, तसेच समाजकल्याण, जिल्हा सैनिक बोर्ड, आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्रशिक्षण केंद्रात नाव नोंदविलेले उमेदवार, या जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्तीची तसेच आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करीत असतील, तर त्यांनी सुध्दा ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत. अशा उमेदवारांना पोलीस घटकांकडून

स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही. तसेच, वरील संबंधीत कार्यालयांनी पोलीस भरतीची जाहिरात आपल्या नोटीस बोर्डावर उमेदवारांच्या माहितीसाठी लावण्याची व्यवस्था करावी.

12.26) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ तसेच महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष)(सेवाप्रवेश) नियम-२०१२, नुसार निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ तसेच, शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतुदी लागु होतील, याशिवाय वैद्यकीय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा, रातआंधळेपणा, वर्णांधळेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे, सपाट तळवे, त्वचारोग, छातीचे रोग, तोतरेपणा इ विषयक चाचण्या व पोलीस महासंचालकांनी वेळोवेळी विहित केलेल्या वैद्यकिय चाचण्यांचा समावेश असेल. या चाचण्यांमध्ये उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास नियुक्ती देण्यात येणार नाही.

12.27) प्रस्तुत भरतीकरिता सर्व अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येतील. अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज भरतीकरिता स्विकारले जाणार नाहीत.

12.28) उमेदवारास स्वत:ची ओळख पटविण्यासाठी पासपोर्ट / पॅनकार्ड / आधार ओळखपत्र / ड्रायव्हींग लायसन्स / निवडणूक ओळखपत्र / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक फोटोसह / शाळा-महाविद्यालयीन ओळखपत्र / सैनिक बोर्डाने दिलेले माजी सैनिकांचे ओळखपत्र भारत सरकार / महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले ओळखपत्र / ग्रामीण भागातील उमेदवारांकरीता तहसीलदाराने यांनी प्रमाणित केलेले कोणतेही फोटोसह ओळखपत्र यापैकी कोणतेही एक ओळखपत्र चाचणीच्या वेळी सोबत आणावे लागेल.

12.29) **पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळी शारीरिक चाचणी दरम्यान उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा / नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. त्याकरिता उमेदवाराने स्वत:ची शारिरीक क्षमता विचारात घेऊन मैदानी चाचणीच्या प्रकारात सहभागी व्हावे.**

12.30) भरती प्रक्रियेमधील कोणत्याही चाचणीसाठी येण्या/जाण्याकरिता उमेदवारांस प्रवास खर्च दिला जाणार नाही. उमेदवारास प्रत्येक पोलीस भरती चाचणीकरिता स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

12.31) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना वापरलेले User ID, Password लक्षात ठेवावेत. तसेच अर्जामध्ये दिलेले भ्रमणध्वनी (मोबाईल क्रमांक) व ई-मेल आयडी कृपया बदलू नयेत.

12.32) उमेदवारांना भरती प्रक्रियेबाबतच्या सूचना / निकाल वेळोवेळी www.policerecruitment2025.mahait.org व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संकेतस्थळ www.mahapolice.gov.in व (संबंधित पोलीस घटकाचे संकेतस्थळ नमूद करावे) या संकेतस्थळावर दिल्या जातील. त्याप्रमाणे उमेदवारांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

12.33) उमेदवाराची गुणवत्ता यादीतील निवड, भरती निकषांची पुर्तता आणि आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रांची अंतिम पडताळणी / आवश्यक ती पूर्तता, वैद्यकीय चाचणी अहवाल, चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवालास अधिन राहून करण्यात येईल. निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरत्या स्वरुपाची असेल. निवड यादीत नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये.

12.34) पोलीस भरतीतील प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील व तो उमेदवारावर बंधनकारक राहील.

12.35) **आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे आवेदन अर्ज भरण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत किंवा त्यापुर्वीच्या दिनांकाची असावीत व सदरची मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे, कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.**

12.36) **समांतर आरक्षणाचा लाभ घेवून निवड झालेल्या उमेदवारांची (खेळाडू / माजी सैनिक / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / होमगार्ड / अंशकालीन / अनाथ) त्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राची संबंधित विभागाकडून पुर्न:तपासणी केल्यानंतरच तपासणीअंती सदर प्रमाणपत्र वैध ठरल्यास उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.**

12.37) उपरोक्त सूचना शासन निर्णय / परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये काही संदिग्धता वाटल्यास उमेदवाराने संबंधित शासन निर्णय / परिपत्रकातील सूचना यांचे अवलोकन करावे.

13) **तात्पुरती निवड यादी व अंतिम निवड यादीबाबत:**

(i) उमेदवारांना शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे कागदपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरती निवडयादी / प्रतीक्षायादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार तयार करुन प्रसिध्द करण्यात येईल. (उदा. गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५ अ, दिनांक १०/१२/२०२०) तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांच्याच कागदपत्राची पडताळणी करण्यात येऊन, कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच अंतिम निवडसूची / प्रतीक्षासूचीमध्ये समावेश करण्यात येईल. **भरती प्रक्रियेत कागदपत्रांची पडताळणी शेवटी करण्यात येणार असली तरी, उमेदवारांनी भरती प्रक्रियेत येतांना प्रवेशपत्रासोबत आवेदन अर्जाची प्रत, आवेदन अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. भरती प्रक्रियेत मूळ कागदपत्रे सादर करण्याबाबत पोलीस घटक प्रमुखांकडून ज्या ज्या वेळी मागणी करण्यात येईल त्या त्या वेळी कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**

Digitally signed by
PRAVINKUMAR TABAJI PADWAL
Date: 28-10-2025 16:23:47

**(प्रविणकुमार पडवळ )**
अपर पोलीस महासंचालक, (अति.कार्य.)
प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई